# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
उद्योग सारथी , महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२६८७००२७/५२/५४/७३, फॅक्स क्र. २६८७१५८७

---

क्र.मऔविम/साप्रवि/आस्था/सेनि.कर्म./बी-१३६३२/२०२३, दिनांक:-१३/०४/२०२३

## जाहिरात

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील कामकाज जलदगतीने होणेकरीता शासकीय / निमशासकीय / महामंडळाच्या सेवेतून खालील नमूद पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची सेवा ११ महिन्याच्या कालावधीसाठी करार पध्दतीने विवक्षित कामासाठी / प्रशासकीय कामासाठी नेमणूक करण्यासाठी नामिकासूची (Panel) तयार करणे आहे. यास्तव खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज दिनांक १७/०४/२०२३ ते दिनांक २४/०४/२०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष सादर करता येतील किंवा gmhrd@midcindia.org या ईमेलवर सादर करण्यात यावेत.

करार पध्दतीने भरावयाची पदे, त्यांची अर्हता, पद संख्या यांची माहिती खालील प्रमाणे

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | तहसिलदार | तहसिलदार या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव | १ |
| २ | नायब तहसिलदार | नायब तहसिलदार या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव | १ |
| ३ | सहाय्यक अभियंता (वि/यां) | सहाय्यक अभियंता (वि/यां) या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव | १ |
| ४ | सहाय्यक अभियंता (स्थापत्य) | सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव | १ |
| ५ | क्षेत्र व्यवस्थापक | क्षेत्र व्यवस्थापक या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव | १ |
| ६ | सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक | सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव | ७ |
| ७ | सहाय्यक | सहाय्यक या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव | ३ |
| ८ | लघुलेखक (उ.श्रे.) | लघुलेखक (उ.श्रे.) या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव | १ |

**सर्वसाधारण सूचना :-**

१) उपरोक्त पदासाठी विहित नमुन्यात कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०४/२०२३ ते दिनांक २४/०४/२०२३ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी महामंडळाच्या प्रस्तावित धोरणानुसार अर्ज संपूर्ण माहिती (बायोडाटासह), फोटो, आवश्यक प्रमाणपत्र व सेवानिवृत्त आदेशासह ( संबंधित कोषागार कार्यालयाचा दाखला व सेवानिवृत्तीपूर्व घेतलेल्या वेतनाचा संबंधित कार्यालयाचा दाखला) अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. अर्ज कार्यालयात प्रत्यक्ष सादर करता येतील किंवा gmhrd@midcindia.org या e-mail वर मेल करता येतील.

२) उपरोक्त नमूद पदावरील कामकाजाचा ५ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.

३) महामंडळाच्या प्रस्तावित धोरणानुसार इच्छुक उमेदवारांची कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी अथवा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसावी.

४) वयोमर्यादा किमान वर्षे ५८ व कमाल ६५ वर्षे.

५) मुदतीत अर्ज करणाऱ्या पात्र अधिकारी / कर्मचारी यांच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३ येथे मुलाखती घेण्यात येतील. मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्ररित्या अर्जदारास त्यांचे ई-मेलवर / भ्रमणध्वनी वर कळविण्यात येईल. त्यासाठी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. मुलाखतीस उपस्थित रहाण्याबाबत उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

६) करार पध्दतीने नियुक्ती देताना ११ महिन्यांची नियुक्ती देण्यात येईल. कामकाज व आवश्यकता विचारात घेऊन त्यानंतर नियुक्तीचे नूतनीकरण करण्यात येईल.

७) उपरोक्त नमूद पदापैकी सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदाचे मुख्यालय अमरावती राहिल. तसेच सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक पदांपैकी एका पदाचे मुख्यालय रत्नागिरी राहील. उर्वरित सर्व पदांचे मुख्यालय हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई राहील.

८) सदर अधिकारी / कर्मचारी यांचे पारिश्रमिक व वेतन महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार निश्चित करण्यात येईल व त्याबाबत महामंडळाचा निर्णय अंतिम राहील.

९) निवड झालेल्या उमेदवारास विहित केलेल्या नमुन्यात हमीपत्र द्यावे लागेल.

१०) विहित नमुन्यात नसलेले अर्ज, अपूर्ण अर्ज, स्वाक्षरी, फोटो नसलेले तसेच आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केलेले अर्ज अपात्र करण्यात येतील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

११) पद संख्या तसेच निवड प्रक्रियेबाबत निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना आहेत.

**सही/-**

**(तुषार मठकर)**
**महाव्यवस्थापक (मबवि)**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.**

**अ) अर्ज करण्याची पध्दत :-**

उमेदवाराने सोबतच्या नमुन्यात स्वत:चे संपूर्ण नांव (आडनांव प्रथम), जन्मदिनांक, वय, लिंग, पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) व मोबाईल क्रमांक, ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नांव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकीय सेवेत असताना मिळालेले अंतिम वेतन व पदनाम तसेच सध्या मिळाणारे निवृत्त वेतन याबाबतचा तपशिल नमूद करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३ यांचे नावे दिनांक १७/०४/२०२३ ते दिनांक २४/०४/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावे किंवा gmhrd@midcindia.org या e-mail वर पाठविण्यात यावेत.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे स्वसांक्षाकित करुन जोडावित.**

१) शासकीय संस्थेकडील सेवानिवृत्तीचा आदेश
२) शैक्षणिक अर्हता व इतर परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या छायांकित प्रती
३) अर्जावर पासपोर्ट आकाराचा फोटो सांक्षाकित करुन चिकटवावा.
४) आधार कार्ड व पॅनकार्ड प्रत.
५) सेवानिवृत्तीचे वेळी मिळणारे वेतनाचा दाखला (वेतनपावती)

**ब) मुलाखत :-**

१) अर्ज सादर करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी मुलाखतीस उपस्थित रहावे.
२) मुलाखतीचे ठिकाण :- "बर्वे सभागृह" महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.
३) मुलाखतीचे वेळी कागदपत्रांच्या मूळ प्रती सोबत आणाव्यात. मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.

**क) सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

**१)** उपरोक्त नमूद पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो.
**२)** सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी वयाच्या ६५ वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील त्यामुळे ६५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनीच अर्ज सादर करावेत.
**३)** संबंधीत पदाचे कामकाज करण्यास अधिकारी सक्षम असणे आवश्यक आहे.
**४)** अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी, अथवा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसावी.
**५)** अधिकारी / कर्मचारी शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.
**६)** नियुक्त करावयाची व्यक्ती / अधिकारी इतर व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
**७)** सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.
**८)** नियुक्त केलेल्या व्यक्तीस नियमित सेवेत घेण्याची अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना आहेत.

सही/-
(तुषार मठकर)
महाव्यवस्थापक (मबवि)
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

**अर्जदाराचा स्वसाक्षांकित फोटो**

**प्रति,**
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,**
**उद्योग सारथी , महाकाली गुंफा मार्ग,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३.**

**विषय :- करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत**
**संदर्भ :- आपली जाहिरात क्र. ____________दिनांक ____________**

**महोदय,**

मी आपल्या महामंडळामध्ये करार पध्दतीने _________________ या संवर्गात काम करु इच्छितो/ इच्छिते.

१) पूर्ण नाव (प्रथम अडनाव) :-

२) पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता :-

३) मोबाईल नंबर :-

४) ई-मेल :-

५) कोणत्या संवर्गातून अर्ज करुन इच्छितात :-

६) जन्मदिनांक :-

७) वय :-

८) स्त्री / पुरुष :-

९) कोणत्या पदावरुन सेवानिवृत्त झाले :-

१०) कोणत्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले :-

**११)**सेवानिवृत्तीचा दिनांक :-

**१२)**सेवानिवृत्तीच्या वेळेचे अंतिम वेतन :-

**१३)**सध्या मिळणारे निवृत्ती वेतन :-

**१४)**अर्जदाराविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू आहे काय ? :-

**१५)** अर्जदारास चौकशी अंती शिक्षा झाली आहे काय ? :-

**१६)**अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

**१७)**अर्जदाराने त्यांच्या सेवाकालावधीत केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशिल :-

**१८)**अर्जदाराने त्यांच्या सेवाकालावधीत केलेल्या कामाचा तपशिल (मागील १० वर्षातील) :-

| पासून | पर्यंत | पदनाम | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

वरील माहितीच्या पुराव्यादाखल मी खालील साक्षांकित कागदपत्रे सोबत सादर करीत आहे. मूळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करीन.

**१)** शासकीय संस्थेकडील सेवानिवृत्तीचा आदेश
**२)** शैक्षणिक अर्हता धारण व इतर परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या छायांकित प्रती
**३)** आधार कार्ड व पॅनकार्ड प्रत.
**४)** सेवानिवृत्तीचे वेळी मिळणारे वेतनाचा दाखला (वेतनपावती)

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वरील सर्व माहिती सत्य आहे. ही. माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार राहीन, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-**

**दिनांक :-** **अर्जदाराची स्वाक्षरी**